International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# एक तपस्वी संशोधक - डॉ. रा. चिं. ढेरे

**Mrs. Sanjivani S.Patil[1] Mr.Suresh Narayan Patil[2]**
[1]Assit.Prof. Marathi Department
[2]Assit.Prof. & HOD History Department, Anandibai Raorane Arts,Comm. & Sci.College, Vaibhavwadi, Dist. – Sindhudurg
***Corresponding Author- Mrs. Sanjivani S.Patil***

**प्रस्तावना -**

एखाद्या समस्येबद्दलची माहिती पध्दतशीरपणे जमा करणे, त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करणे आणि संकलित माहितीचे तर्कशुद्धरित्या अर्थनिर्वचन करणे म्हणजे संशोधन होय. ज्ञानाचे क्षेत्र व्यापक करण्याकरिता,समस्यांचे आकलन व निराकरण करण्याकरिता संशोधन हे महत्त्वाचे साधन आहे. शोध घेणे किंवा कोणत्याही गोष्टीबद्दल एक प्रकारची उत्सुकता बाळगून कुतुहलाने निरीक्षण करणे, हा एक मानवी स्वभावच आहे. जर आपण मानवाचा इतिहास बघितला तर त्याची टप्प्याटप्प्याने प्रगती होत गेली. त्या प्रगतीतील मूळ कारण हाच स्वभाव आहे. जिथे-जिथे काही वेगळे दिसेल, नवीन दिसेल तिथे कुतुहलाने पाहणे; त्यातील नावीन्य आहे ते शोधणे आणि त्या नाविन्याचा स्वतःच्या जगण्यामध्ये कुठे उपयोग करता येतो का हे पाहणे, असा त्याचा प्रवास आपल्याला पाहायला मिळतो. अशा या संशोधनाबद्दल काही व्याख्या पाहता येतात.त्यातून ही संकल्पना स्पष्ट होते

१) टकमन- "संकलन व विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याची व्यवस्थाबद्ध प्रक्रिया म्हणजे संशोधन होय".

२) ग्रॅनाईल- "सर्वसाधारणपणे उपयोगात आणता येण्याजोगे नवे ज्ञान निर्माण करण्यासाठी आणि समस्यांची सोडवणूक करण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्दतींचा अवलंब करून जी संरचित तपासणी केली जाते त्याला संशोधन असे म्हणतात".

३) एल.व्ही. रोडग्र आणि ए.व्ही.एच. मोरी
" नवीन ज्ञान प्राप्तीच्या व्यवस्थित प्रयत्नाला संशोधन असे म्हणतात".

४) ."संशोधन हे नवीन ज्ञानाचे संपादन करणे आणि जुन्या ज्ञानाचे परीक्षण करण्यासाठी केले जाते. तसेच आरुपाला रूप देणे, अज्ञाताला ज्ञात जगतात ओढून आणणे म्हणजेच संशोधन होय". संशोधन करणे हे कोणत्याही शास्त्राचे ध्येय असते. संशोधन ही एक प्रक्रिया आहे. जिज्ञासा अथवा ज्ञान संपादन करणे, ही माणसाची मुलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी प्रत्येक घटनेबद्दल का, कसे व काय ह्या प्रश्नांची उत्तरे तो आपल्या बुद्धीने शोधून काढतो. मिळवलेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करतो. ज्ञान अथवा तथ्ये प्राप्त करून घेणे म्हणजेच शास्त्र नव्हे. नुसत्या संग्रहित ज्ञानाला संशोधन म्हणत नाहीत . तर हे ज्ञान अथवा नवे संदर्भ कोणत्या तरी पद्दतीने व्यवस्थित रूपाने संग्रहित करावे लागतात. आधुनिक कालखंडात तर या अशा पद्धतीने संग्रहित केलेल्या लेखनाला विशेष महत्व असते. हे संशोधन म्हणजे जसे नवे ज्ञान असते, तसेच ते नव्या मूल्यांची ओळख करून देणारे शास्त्रही असते. आधुनिक कालखंडातील असेच एक संशोधक डॉ. रा.चिं. ढेरे होत.ज्यांनी लोकसंस्कृती आणि ऐतिहासिकता यामधील अनेक अशा गोष्टींबद्दल जाणून घेत त्यातील समृद्धता, विशेषता अतिशय व्यापकतेने, वेधकपणे साहित्यात मांडलेली आहे. अर्थात यासाठी संशोधनाच्या पद्धतीचा त्यांनी पण आधार घेतलेला आहे. या माध्यमातून त्यांनी जी मांडणी केलेले आहे त्या मांडणीला जशी संशोधनाची चौकट आहे तसेच साहित्याचे विविध पैलू सुद्धा आहेत .

**उद्दिष्टे-** डॉ. रा.चिं.ढेरे यांच्या संशोधन कार्याला उजाळा देणे.

**गृहीतक-**

डाॅ. रा.चिं. ढेरे यांचे मराठी साहित्य मध्ये सांस्कृतिक सामाजिक आणि साहित्यिक अंगाने संशोधनपर अतिशय मौलिक लेखन केलेले आहे. त्या लेखनाची मौलिकता

स्पष्ट करणे. डॉ .रामचंद्र चिंतामण ढेरे: (२१ जुलै १९३० – १ जुलै २०१६). डॉ. रा. चिं. ढेरे यांचा जन्म महाराष्ट्रातील मावळ भागातील निगडे या गावी झाला. त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षी त्यांचे वडील चिंतामण गंगाधर ढेरे यांचे उर्से धामणे या गावी आकस्मित निधन झाले. त्या वेळी वडिलांचे वय फक्त तीस वर्षाचे होते. वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या तेवीस वर्षाच्या आईनेही तेराव्या दिवशी मृत्यू स्वीकारला. तेव्हा ढेरे हे अवघे पाच वर्षांचे तर लहान बहीण दोन वर्षांची होती. अगदी लहान वयात ही दोन्ही भावंडे पोरकी झालीत . अशा वेळी त्यांच्या वृद्ध आजीने त्यांना आधार दिला. अगदी लहान वयात सगळयाच अर्थाने अभावाचे स्थिती होती. याच स्थितीत वाढत असताना ते पुढे पुण्यात आले. इथे आल्यावर मात्र एकाच वर्षात दोन-दोन इयत्ता उत्तीर्ण करत, रात्रशाळेत शिकत १९५० साली ते मॅट्रिक झाले. शालेय शिक्षणाबरोबरच त्यांनी हिंदी परीक्षा दिल्या. ग्रंथपालन, एस.टी.सी. यांसारख्या पदविका त्यांनी मिळविल्या. ५ जून १९५५ रोजी इंदूबाला यांच्याशी त्यांचा प्रेमविवाह झाला.

पुण्यात येण्यापूर्वी सात-आठ वर्षाच्या त्यांच्या बालमनावर ग्रामजीवनाचे, तेथील ग्रामसंस्कृतीचे, चालीरीती, परंपरा, धार्मिक वातावरण यांचेच परिणाम झाले होते. पुण्यात आल्यावर हे लोकसंस्कृतीचे संस्कार आणि चौथीपर्यंत थांबलेले शिक्षण एवढेच काय ते त्यांच्याजवळ होते. जन्मापासूनच संकटांचा सामना ढेरे यांना करावा लागला. आप्तजन व जिवलगांचे मृत्यू, दारिद्र्य आणि दीर्घ आजार या साऱ्या आपत्तींना तोंड देत त्यांनी त्या वेळी सुरु केलेला ज्ञानयज्ञ शेवटच्या श्वासापर्यंत सुरु ठेवला. कधी टी डेपोत, कधी पुठ्ठ्यांची खोकी बनवणाऱ्या कारखान्यात, कधी छापखान्यात मुद्रितशोधक म्हणून, तर कधी विद्यालयात ग्रंथपाल म्हणून काम करीत ते शिकत राहिले. अशा लहानसहान कामातून आर्थिक प्राप्ती व्हायची. ज्यावर आपला व कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालायचा.अशा सगळयाच कामांना त्यांनी १९५९ मध्ये राम राम ठोकला . आपल्या संशोधन कार्याला पूर्णवेळ वाहून घेतले. कोणतेही आर्थिक बळ नाही. दहा-बाय दहाच्या एका छोट्या कायम ओल असलेल्या खोलीत त्यांचा संसार होता. अशा प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष चालू असतानाच पानशेतच्या पुरात सगळे वाहून गेले. जवळजवळ पाच हजार ग्रंथांचा संग्रह, लेखनासाठी जमा केलेले संदर्भ-साधने, टिपणे असं सारं साहित्य पाण्यात गेलं. या परिस्थितीतही विचलित न होता, त्यांनी पुन्हा नवे आयुष्य सुरू केले. वाचन,लेखन चालूच होते. काही लेख व पुस्तके प्रकाशित होत होती. हे सांभाळून ते १९६३ मध्ये बाहेरून बी.ए. झाले. विद्यापीठात एम.ए.ला असतानाच त्यांचे पुस्तक एम.ए.च्या अभ्यासासाठी होते.परंतु तत्कालीन विद्यापीठातील काही वृत्तींमुळे त्यांच्या टर्म्स मंजूर झाल्या नाहीत. तरीही १९७५ मध्ये एम.ए.शिवाय ते पीएच.डी. झाले. त्याच विद्यापीठाने पुढे त्यांच्या ग्रंथांना डी.लिट. ही पदवी दिली. या सर्व खडतर प्रवासामध्ये त्यांच्या पत्नीचे सहकार्य हे मोलाचे आहे. त्यामुळेच फारसे आर्थिक स्थैर्य नसतानाही त्यांना आपले हे संशोधन वृत्तस्थ भूमिकेतून करता आले.

महाराष्ट्रातील धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, लोकसंस्कृती, लोकसाहित्य, संतसाहित्य आणि काव्यशास्त्र याविषयी संशोधन करणारे व्रतस्थ संशोधक, अभ्यासक, लेखक आणि संपादक, हीच ओळख आज डॉ. रा. चिं. ढेरे यांची आहे .महाराष्ट्राच्या बाहेरही देश-विदेशातील संशोधक, धर्मेतिहासाचा सखोल, सूक्ष्म आणि सर्वांगीण अभ्यास प्रातिभ बुद्धीने करणारा संशोधक म्हणून रा. चिं. ढेरे यांना ओळखतात. महाराष्ट्र संस्कृतीच्या भाष्यकारांपैकी एक महत्त्वाचे भाष्यकार म्हणूनही त्यांचे स्थान आहे. महाराष्ट्राच्या धर्मजीवनाचा, समाजधारणांचा आणि सांस्कृतिक इतिहासाचा त्यांनी खोलवर शोध घेऊन त्याचा नवा अन्वय लावला आहे.

**डॉ. ढेरे यांची ग्रंथनिर्मिती –** डॉ. ढेरे यांच्या ग्रंथ निर्मितीचा प्रवास १९५० पासून सुरू होतो; पण त्याआधी त्यांनी म.म.चित्रावशास्त्रींच्या 'समर्थ' या नियतकालिकातून तकाही कविता व लेख लिहिले. डॉ. ढेरे यांचा मूळ पिंड काव्याचा. आहे तरीपण 'केसरी' व 'साधना' मासिक यामधून स्फुटलेखन केले. रेडिओसाठी सांगीतिका लिहिल्या. १९५० साली त्यांनी

सरदार वल्लभभाई पटेलांचे लघुचरित्र लिहिले. पुढे महात्मा चक्रधर नृपनिर्माता चाणक्य इत्यादी सहा लघुचरित्रे मुलांसाठी लिहिली. १९५२-५३ साली त्यांनी भोर संस्थानच्या 'शंकराजी नारायण' पारितोषिकासाठी नाथ संप्रदायावरती लघुप्रबंध लिहिला. त्याला पुरस्कारही मिळाला आणि इथूनच एका अर्थाने डॉ. ढेरे यांचे लेखन कार्य सुरू झाले आणि ते अखेरपर्यंत राहिले. डॉ. ढेरे यांचा व्यक्तिगत ग्रंथसंग्रह मोठा आहे.त्यांच्या या ग्रंथसंग्रहाच्या आधारे संस्कृतीच्या क्षेत्रात नव्या जुन्या संशोधकांसाठी 'डॉ.रा.चिं.ढेरे संस्कृती- संशोधन केंद्र' या न्यासाची स्थापना करण्यात आली आहे. या स्थापनेमागे त्यांच्याच महत्वपूर्ण संशोधन कार्याची प्रेरणा आहे. त्यांच्या लेखन संशोधनाची परंपरा त्यांच्या कुटुंबियांनी पुढे नेली आहे. त्यांच्या जेष्ठ कन्या अरूणा ढेरे या राष्ट्रीय कीर्तीच्या अभ्यासक,व्याख्यात्या,संशोधक आणि कवयित्री असून भारतीय संस्कृतीतील मिथकांचा त्यांनी ललित साहित्याच्या अंगाने अभ्यास केला आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही अरूणा ढेरे यांनी भूषविले आहे. ढेरे यांची दुसरी कन्या वर्षा गजेंद्रगडकर ह्या लेखिका आहेत तसेच त्यांचे पुत्र मिलिंद ढेरे हे राष्ट्रीय कीर्तीचे छायाचित्रकार आहेत.

डॉ. ढेरे यांची महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही एक व्रतस्थ ज्ञानोपासक म्हणून त्यांची ओळख आहे. एक लेखनोपजीवी संशोधक म्हणून ते सत्तर वर्षे केवळ ग्रंथांच्या सहवासातच वावरले. त्यांची लोकतत्त्वीय अध्ययनबुद्धी संशोधनक्षेत्रात अपूर्व आहे. सांस्कृतिक इतिहासाच्या अनेक प्रश्नांची उकल करतानाच त्यांनी मराठी धर्मजीवनाचे संपूर्ण दशर्नच घडविले. महत्त्वाचे म्हणजे या कायार्तून त्यांनी भारतीय संस्कृतीशी असलेला मराठीचा अनुबंधही स्पष्ट केला.

**डॉ.रा.चिं.ढेरे यांची ग्रंथसंपदा –**

श्रीनरसिंह सरस्वती : चरित्र आणि परंपरा , तुका झालासे कळस, श्रीगुरु गोरक्षनाथ : चरित्र आणि परंपरा, नामयाची जनी, त्रिभुवनेश्वर लिंगराज , श्रीशारदामाता : चरित्र आणि उपदेश,खंडोबा, मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, रामराज्याची स्फूर्तिकेंद्रे, मुसलमान मराठी संतकवी, विविधा, लोकसंस्कृतीची क्षितिजे, गंगाजळी, शक्तिपीठांचा शोध, लौकिक आणि अलौकिक, चक्रपाणि,शोधशिल्प, मानसयात्रा, महाराष्ट्राचा देव्हारा,लज्जागौरी, संतसाहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध, श्रीविठ्ठल : एक महासमन्वय, कल्पद्रुमाचिये तळी, लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा हे त्यांचे ९० च्या दशकापर्यंतचे महत्त्वाचे ग्रंथ होत. पुढे श्रीनरसिंह सरस्वती : चरित्र आणि परंपरा या ग्रंथाला परिष्कृत करून दत्त संप्रदायाचा इतिहास हा ग्रंथ तयार करण्यात आला. शक्तिपीठांचा शोध आणि मातंगीपट्ट या पुस्तिकांचा समावेश लज्जागौरी या ग्रंथात करण्यात आला. १९९६ नंतर ढेरे यांनी आपल्या पूर्वीच्या संशोधनाचे पुनर्व्यवस्थापन करून काही ग्रंथांच्या नव्या आवृत्त्या प्रकाशित केल्या, तर काही नवीन ग्रंथही सिद्ध केले. नाथ संप्रदायाचा इतिहास, लोकसंस्कृतीचे उपासक, लोकदैवताचे विश्व, भारतीय रंगभूमीच्या शोधात, संत, लोक आणि अभिजन, दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा, श्रीआनंदनायकी, आज्ञापत्र या ग्रंथांचा त्यात समावेश आहे. त्याबरोबरच शिखर शिंगणापूरचा श्रीशंभुमहादेव, श्रीतुळजाभवानी, करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी, श्रीवेंकटेश्वर आणि श्रीकालहस्तीश्वर, श्रीपर्वताच्या छायेत, त्रिविधा, श्रीनामदेव, जनी आणि नागरी , श्रीनरसिंहोपासना : उदय आणि विकास हे त्यांचे अलीकडील आहेत.

**डॉ. ढेरे यांची विशेष संपादने-**

स्वतंत्ररित्या केलेल्या ग्रंथनिर्मिती सोबतच डॉ. ढेरे यांनी अनेक ग्रंथांचे संपादनही केले आहे. या संपादनातून सखोल विवेचकता व अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्या आहेत. संस्कृतिसुगंध,मराठी भक्तिपरंपरा आणि श्रीरामकृष्णविवेकानंद, श्रीज्ञानेश्वरांचे विविधदर्शन व नवदर्शन ही सहयोगातून साकारलेली संपादने आहेत. समाजरचना आणि विवेकनिष्ठा, संत आणि समाज यांसारखी अन्य अभ्यासकांचे संकलित लेखन एकत्र करून त्याकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टी देणारी संपादने आहेत. 'वारसा' या अन्वर्थक नावाने सारस्वतकार भाव्यांच्या लेखनाचे त्यांनी संपादन केले आहे. श्रीकृष्णचरित्र, आज्ञापत्र, महिकावतीची बखर, शिवदिग्विजय अशा महत्त्वाच्या व प्रमुख कृतींचे

संस्करण करून नेटके संपादन केले आहे. हरिवरदा, खंड ४ – ८,नरेंद्रकृत रुक्मिणी स्वयंवर, गोपालनाथ गाथा, चिंतामणिनाथांचे ज्ञानकैवल्य, श्यामराजनानागाथा, श्रीधरांचे मल्लारिमहात्म्य, गंगाधराचा मार्तंडविजय,मुरारिमल्लांची बालक्रीडा अशी प्राचीन काव्यांची संपादनेही त्यांनी केली आहेत. ही सर्व संपादने, चरित्र, बखर, कथाकाव्य, चंपू, गाथा, पदावली आणि बालक्रीडा अशी वैविध्यपूर्ण आहेत. संतांच्याआत्मकथा, संतांच्या चरित्रकथा यांशिवाय आणखी वीस प्रस्तावना त्यांनी लिहिल्या आहेत. पंधरा लघुप्रस्तावना आहेत. असे वैशिष्टपूर्ण संपादन,विवेचन, प्रस्तावना, उपलब्धीनुसार संहिता, स्पष्टीकरणात्मक टिपा व उपयुक्त परिशिष्टांसह असल्यामुळे या विविध वाङ्मयप्रकारांच्या अभ्यासात हा पहिलाच प्रयत्न ठरतो. संपादित ग्रंथांची ही संख्या एकूण सत्तावीस

लोकतत्त्व व धर्मसंप्रदायाच्या चिकित्सक अभ्यासात रमलेल्या डाॅ. ढेरे यांनी 'बोरकरांच्या प्रेम कविता'(१९८७ ) हा ग्रंथ संपादित केला . याशिवाय स्फुट लेख व टिपणे तसेच अनेक ललितलेख, विविध वृत्तपत्रांतून, नियतकालिकांतून त्या-त्या काळात प्रकाशित होत गेले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पंचावन्न ललित लेखांचे संकलन करून 'ललितबंध' हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. सहयोगी लेखकांच्या सहकार्याने डाॅ. ढेरे यांचे अकरापेक्षा अधिक लेख हिंदीतून प्रसिद्ध झाले आहेत. साहित्य अकादमीप्राप्त श्रीविठ्ठल : एक महासमन्वय या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद ॲन फेल्डहाऊस या विदुषीने केला. तो ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यूयार्कतर्फे प्रकाशित झाला आहे. 'लज्जागौरी' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद जयंत बापट यांनी केला असून तो मोनॅश युनिव्हर्सिटी मेलबर्न, ऑस्ट्रेलिया या प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित झाला आहे. लज्जागौरी, श्रीविठ्ठल : एक महासमन्वय, दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा, नाथ संप्रदायाचा इतिहास आणि अन्य सहा ग्रंथ कन्नडमध्ये अनुवादित झाले आहेत.

**रा. चिं. ढेरे यांची प्रमुख संशोधने**

डाॅ.रा.चिं. ढेरे यांचे संशोधन त्यांच्या बहुश्रुततेची आणि चिकित्सकतेची साक्ष घडवते. संशोधन कसे करावे, याबद्दलचे तंत्रशुद्ध शिक्षण डॉ. ढेरे यांनी कुठेही घेतले नव्हते. त्यांच्या संशोधन कार्यावर द.वा. पोतदार, धर्मानंद कोसंबी, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, व्ही. एस. अगरवाल व राजवाडे यांचा प्रभाव आढळतो. वर्तमान काळातील लोकसंस्कृती व मध्ययुगीन मराठीतील अप्रतिम साहित्य लेणी शोधून काढत त्यांचे संपादन केले. 'नरेंद्रांचे रुक्मिणी स्वयंवर', 'श्रीकृष्णचरित्र' , 'महिकावतीची बखर', 'शिवदिग्विजय', 'मुरारी मल्लाची बालक्रीडा', 'सुभद्रा स्वयंवर', ही त्यातील काही प्रमुख संपादने आहेत. या संपादनातून आवश्यक ती विवेचकता, प्रस्तावना, संहितेची प्रमाणता , स्पष्टीकरणात्मकता हे सर्व घटक त्यामध्ये सामावलेले दिसतात प्राचीन मराठी साहित्यावर विविध धर्मसंप्रदायांचा प्रभाव होता. या संप्रदायांत अनुयायी होते तसेच ग्रंथकारही. त्यांपैकी ज्यांचा प्रभाव होता, त्या गाणपत्य आणि जैन ग्रंथकारांनी प्राचीन मराठी वाङ्मयात मौलिक भर घालून ते समृद्ध केले. या ग्रंथकारांची आणि ग्रंथकृतींची चर्चा करणारे, त्यांचा मागोवा घेणारे लेख या ग्रंथात समाविष्ट झाले आहेत. डॉ. ढेरे वाङ्मयाचा अभ्यास करतानाच वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमीही शोधतात. त्याच्या आधारे समाजजीवनाची विविध अंगे, त्यांचे परस्परसंबंध उलगडून दाखवतात. आपल्या काही ग्रंथांतून त्यांनी संतचरित्राचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. संतचरित्र म्हटल्यानंतर त्यांची एकूणच जीवनातील वाटचाल,असा एकूण लिखाणाचा सारांश असतो. पण डॉ. ढेरे यांनी संपादित केलेले हे चरित्रग्रंथ केवळ परिचयात्मक नसून नवी दृष्टी प्रदान करतात. महाराष्ट्राच्या एकूण संस्कृतीत जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारे वेगवेगळे संप्रदाय आहेत. या संप्रदायातील साहित्यामुळे वर्तमान काळातही प्रेरणादायी असे स्त्रोत सापडतात. अशा या मराठी वांङमयाला प्रेरणा देणाऱ्या वेगवेगळ्या संप्रदायांचा अर्थपूर्ण अभ्यास हाही त्यांच्या संशोधनाचा एक विषय आहे.

इतिहासाचे कुठलेही अंग असो, संशोधनातून नवे धागेदोरे, त्यांची नवी संगती पुढे आणली. अशावेळी वादही उद्भवले. असा एक वाद 'श्री विठ्ठल-एक

महासमन्वय' या महाग्रंथावेळी निर्माण झाला होता. अशावेळी शांत संयत वृत्तीने त्यांनी 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास' व 'प्राचीन मराठी साहित्य' याविषयीचे आपले लेखन सुरूच ठेवले. 'नाथ संप्रदायाचा इतिहास', 'दत्त संप्रदायाचा इतिहास', 'प्राचीन मराठीच्या नवधारा', 'चक्रपाणी', 'हे त्यापैकी महत्त्वाचे ग्रंथ होत. त्यातील 'चक्रपाणी' हा त्यांच्या अभ्यासाचा व संशोधन पद्धतीचा उत्तम नमुना होय. 'षटस्थळ' या विसोबा खेचरांच्या नव्यानेच उपलब्ध झालेल्या ग्रंथातील गुरुपरंपरेचे निमित्त साधून त्यांनी चक्रधरांच्या जीवनावर एक नवा प्रकाशझोत टाकला आहे. चक्रधरस्वामी-चांगदेव राऊळ व हरिनाथ यांचे एकत्व प्रतिपादन करतानाच 'षटस्थला'मधील गुरुपरंपरेचे संबंध उकलून दाखवले. हे संदर्भ उकलून दाखविताना त्यांनी महानुभावी यांच्या पारंपरिक श्रद्धांना धक्का दिला आहे. हा धक्का म्हणजे त्यातील काही नवीन संदर्भ आहेत.त्यांच्या संशोधनपर ग्रंथांतून त्यांचा सखोल व्यासंग आणि दीर्घकालीन चिंतन प्रकट झालेले आहे.

'शिखर शिंगणापूरचा श्रीशंभूमहाराज' या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आणि त्यांच्या सिसोदिया कुळाच्या अज्ञात पार्श्वभूमीवर आंतरज्ञानशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करून इतिहासाची पुनर्मांडणी करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. ही सर्वच ग्रंथलेखन म्हणजे एक प्रकारची कसोटी होती. कारण वर्तमान काळातील जनमानसात काही पारंपरिक घटक अगदी घट्ट असतात. अशा या मानसिकतेला हात घालत नवीन संदर्भ देणे हे एक प्रकारचे आव्हान असते. डॉ. ढेरे यांनी हे आव्हान त्यांच्या अनेक ग्रंथांच्या संदर्भातून स्वीकारलेली दिसते. त्यामुळेच त्यांची लेखन शैली बरेचदा काळाच्या कसोटीवर उतरलेली आहे. 'गधेगाळी' हा शिव्यांच्या उगमाविषयी अत्यंत संयमानं आणि शास्त्रीय विचार पद्धतीनं लिहिलेला लेख आहे. समाजाजीवनामध्ये असणारा हा मनोविकार आहे. जो वाचिक रूपाने बाहेर पडतो. अशा या मनोविकारांच्या संबंधाने हा लिहिलेला हा ग्रंथ म्हणजे एक संशोधनाचा उत्तम नमुना आहे. याच बरोबर कवी मुकुंदराज यांच्या वांग्ङमयाविषयी सुद्धा डॉ.रा. चिं. ढेरे यांनी संशोधन केले आहे. मध्ययुगीन मराठीमध्ये आणि एकूणच महाराष्ट्रावरील कवी मुकुंदराज यांच्या वांङमयाचा प्रभाव आजही स्पष्ट होतो. श्रीज्ञानदेवांप्रमाणेच जाती, धर्म, भाषा, प्रदेश यांच्या सीमा मुकुंदराजांनी ओलांडून आपली परंपरा सिद्ध केली आहे. त्यांचे हे महत्त्व ओळखून डॉ. ढेरे यांनी कवी मुकुंदराज यांच्या लेखणीचे विशेष मांडले आहेत. हे संशोधनकार्य करताना डॉ. ढेरे यांनी त्यामध्ये रुक्षता, जडजंबालता येऊ दिली नाही. हे नवे संदर्भ वाचकांना वाचनीय कसे होतील यादृष्टीने त्यामध्ये लालित्य आणले.

**डॉ. रा. चिं. ढेरे यांना लाभलेले सन्मान-** डॉ. रा. चिं. ढेरे यांना त्यांच्या या संशोधन कार्याच्या वाटचालीत अनेक सन्मान लाभले. त्याचप्रमाणे काही महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम आहे केले.ढेरे यांच्या सत्तर वर्षाच्या लेखनप्रवासात अनेक सन्मानाचे क्षण आले. अनेक प्रतिष्ठित संस्थांनी त्यांचा गौरव केला, पुरस्कार दिले. महाराष्ट्र राज्य शासनाचे त्यांच्या वेगवेगळया ग्रंथांना नऊ वेळा पुरस्कार मिळाले आहेत. याशिवाय 'साहित्य अकादमी' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' (१९९०) त्यांना देण्यात आला. महाराष्ट्र शासनाचा पहिला 'ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार'ही त्यांना मिळाला आहे. याशिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ; पुणे, मुंबई विद्यापीठ, डेक्कन कॉलेज; पुणे, पुणे महानगरपालिका, राजवाडे संशोधन मंडळ ; धुळे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, महाराष्ट्र फाउंडेशन, भैरुरतन दमाणी पुरस्कार ; सोलापूर, त्रिदल फाउंडेशनचा पुण्यभूषण पुरस्कार, संगीत नाटक अकादमीचा रवीन्द्रनाथ टागोर सन्मान इत्यादी पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. संगीत नाटक अकादमी नवी दिल्ली अशा मान्यवर संस्थांनी त्यांना सन्माननीय सदस्यत्व सत्कारपूर्वक दिले आहे. जून १९६५ ते ऑगस्ट १९६६ या कालावधीत त्यांनी भारतीय संस्कृतीकोश मंडळात उपसंपादक म्हणून काम पाहिले. डेक्कन महाविद्यालयामध्ये विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे १९७६ ते १९७८ या काळात 'बालग्रह : एक दैवतशास्त्रीय अभ्यास' हा शोधप्रकल्प त्यांनी पूर्ण केला.

पुढे जून १९७९पासून पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे 'श्री विठ्ठल दैवत, संप्रदाय आणि साहित्य' या शोधप्रकल्पाला प्रारंभ करून तो पूर्ण केला. त्यांना पुणे विद्यापीठाने १९८० साली डी.लिट. पदवी प्रदान केली.

**डॉ. ढेरे यांच्या संशोधनाचे विशेष-**

• डॉ. ढेरे यांच्या एकूणच संशोधन कार्याचे काही विशेष पण आहेत. त्यांनी अभिजात परंपरा आणि लोकपरंपरा यांनी निर्माण केलेल्या दैवतांच्या अभ्यासासाठी दैवतशास्त्रीय आणि मिथक विज्ञानाचा आधार घेतला. विविध ज्ञानशाखांचे परस्परसंबंध स्पष्ट करतानाच त्यांनी अभिजन-संस्कृती आणि बहुजन–संस्कृती यांच्यामधील सीमारेषा पुसून टाकण्याचा प्रयत्न केला. बहुजनांच्या संस्कृतीच्या अभ्यासातून बहुजनांच्या उन्नयन प्रक्रियेचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

• डॉ. ढेरे यांचे संशोधन एका विषयापुरते मर्यादित राहिले नाही. विविध ज्ञानशाखांच्या अभ्यासातून नवी मांडणी करत ते बहुविध आणि बहुपदरी वाटांनी उलगडत राहिले.

• त्यांनी संतसाहित्याचे अनेक अंगांनी पुनर्मूल्यांकन केले. अनेक अज्ञात व अलक्षित ग्रंथकारांची नव्या
मांडणीतून नवी ओळख करून दिली.

• नव्या संशोधन दृष्टिकोनातून लोकसाहित्याच्या अभ्यासाला केला. लोक साहित्याच्या समीक्षेचा पाया घातला. तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, मानसशास्त्र, स्थळशास्त्र, मानववंशशास्त्र, आदिबंधात्मक धारणा या साऱ्या ज्ञानशाखांना स्वीकारत त्यांनी त्यांचा गरजे नुसार वापर करत आपल्या संशोधनात आंतरज्ञानशाखीय (Inter-Disciplinary) शोधपद्धती अवलंबली. या सर्व संशोधन प्रक्रियेत देशी संकल्पना मात्र महत्त्वाचे मानली. यातूनच विविध पंथांचा त्यांनी अभ्यास केला. वारकरी, महानुभाव, पाशुपत, शैव, दत्त, नाथ, लिंगायत, सूफी, नागेश, गाणपत्य यांसारख्या विविध संप्रदायांची दखल घेत अतिशय व्यापकपणे या सगळ्यांचे संशोधन केले. . या अनुषंगाने त्यांनी काही ग्रंथांची निर्मितीही केली आहे .

• डॉ.ढेरे यांच्या संशोधनात बहुजनांच्या संस्कृतीइतकेच नारीतत्त्वाला महत्त्व आहे. सुफलीकरण या तत्वातील भूमी आणि स्त्रीचे महत्त्व त्यांनी ओळखले होते.'लज्जागौरी', 'श्रीआनंदनायकी' यांसारख्या ग्रंथांतून संस्कृतीच्या मूलगामी तत्त्वाचा, नारीतत्त्वाचा उलगडा केला आहे . आपल्या संशोधनातून प्रारंभबिंदू कडे जात आदिमायेच्या आदितत्त्वाच्या चिंतनात त्यांनी विशेष रस घेतला आहे. त्यांची ही रसतन्मयता त्यांच्या अनेक ग्रंथामधून व्यक्त झाली आहे. आयुष्यभर त्यांनी अखंड शोधमग्नतेतून अनेक जटिल सांस्कृतिक समस्यांची उकल केली .

• डॉ. ढेरे यांच्या संशोधनाचा आणखीन एक विशेष म्हणजे, मराठी संस्कृतीत दाक्षिणात्य संस्कृतीचे घटक कसे कार्यरत राहिले, दाक्षिणात्य संस्कृतीशी महाराष्ट्राचे अनुबंध किती प्राचीन आणि पक्के आहेत, याचे स्पष्टीकरण होय. त्यांच्या संशोधनातून प्रथमच आन्ध्र, तामिळनाडू, कर्नाटक यांचे महाराष्ट्राशी असलेले सांस्कृतिक नाते व त्यांचा प्रभाव विविध ग्रंथांतून अधोरेखित झाला आहे.
वारकरी, महानुभाव, पाशुपत, शैव, दत्त, नाथ, लिंगायत या विविध संप्रदायांच्या अभ्यासातूनच चक्रपाणी, दत्त संप्रदायाचा इतिहास, नाथ संप्रदायाचा इतिहास अशा ग्रंथांची त्यांनी निर्मिती केली. या सर्व ग्रंथांतून दक्षिणेतील संस्कृतीचे संदर्भ अधोरेखित झाले आहेत.

• डॉ. ढेरे यांच्या संशोधनपद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे त्यांचे संशोधनविश्व एकाच पद्धतीचे नाही किंवा एकाच संदर्भात नाही. ते अनेक प्रमेयांची मांडणी करतात, मिथके आणि सत्य यांचा शोध घेतात. खूप कष्टाने साधने गोळा करतात. या सगळ्या साधनांचा अलिप्तपणे विचार करतात. त्यातून मिळालेल्या उपलब्ध साधनांचा ते अलिप्तपणे विचार करतात. त्यातून पुढे ते निष्कर्ष मांडतात.

• ही साधने उपलब्ध करण्यासाठी त्यांनी भारतभर आणि विशेषत: दक्षिणेकडील राज्यात केलेला प्रवास केला आहे. हा सगळाच प्रवास तसा कठीण होता. अनोळखी भागात अनेक अडचणींचा प्रवास करण्याचे आव्हान म्हणजे त्यांचे संशोधनातील प्रेम होते. तेथील मंदिरे, धर्मशाळा, जुनी जाणती माणसं, त्या-त्या

ठिकाणचे ग्रंथसंग्रह, मंदिरे यांना त्यासाठी पुन:पुन्हा भेटी दिल्या. आपली मूळ श्रद्धेय भूमिका बाजूला ठेवून त्यांनी पूर्वग्रहविरहित अशी काटेकोर चिकित्सा केली आहे.

• डॉ. ढेरे ह्यांच्या संशोधन, मंथनातून जे नवे सत्य समोर आले, संदर्भ समोर आले. त्यातून काहीवेळा सांस्कृतिक - सांप्रदायिक परंपरेला धक्काही बसला. अशा वेळेला असा धक्का सहन करण्याची सहनशीलता समाजात असतेच असे नाही. त्यामुळे काही वाद निर्माण झालेत. मात्र अशा कोणत्याही वादा-प्रवादात नअडकता अविरतपणे आपली भूमिका निभावणारे हे तपस्वी संशोधक आहेत.

• त्यांच्या संशोधनाच्या वाटचालीत प्राचीन मराठी वाङ्मयाभ्यासाची साधने शोधून काढण्यात पहिली तीस वर्षे गेली आहेत. तर पुढील वर्षांमध्ये त्या साधनांची विविधता, प्रकार आणि विविध पातळयांवर उपयुक्तता जाणून घेणे घेतली, प्राचीन मराठीच्या अभ्यासाचे मार्ग तपासून पाहणे हे निष्ठेने केले आहे .

• डॉ. ढेरे यांनी आपला संशोधन कार्यासाठी कोणत्याही संस्थेचे साहाय्य घेतले नाही. विविधांगी आणि विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली. वेगवेगळया पातळयांवरून त्यांनी केलेले संशोधन म्हणजे साहित्य संचिताचे एक महत्त्वाचे पर्व आहे.

**निष्कर्ष-** १) डॉ. रा. चिं. ढेरे यांचे संशोधन म्हणजे महाराष्ट्राच्या ऐतिहासिकतेचे व सांस्कृतिकतेचे एक महत्त्वपूर्ण चिंतन आहे.

२) त्यांच्या या संशोधनातून अनेक नवीन ज्ञान समोर आलेले असून या नव्या मांडणीतून अनेक संदर्भ स्पष्ट झालेले आहेत .

३) डॉ.ढेरे यांनी संशोधन करताना कोणत्याही दबावाला अगर प्रवाहाला बळी न पडता एका तपस्वी भावनेतून हे संशोधन केले आहे.

४) डॉ. ढेरे यांची संशोधन शैली तितकीच महत्त्वपूर्ण आहे कारण त्यांची ललित भाषा वाचकांना भुरळ पाडू लागली. रुक्षता, जडजंबाल वाक्यरचना या सार्यांना फाटा देऊन हे मूलगामी लेखन केले आहे.

४) डॉ. ढेरे यांनी धर्म, तत्त्वज्ञान,लोकसंस्कृती आणि इतिहास हे घटक केंद्रभूत मानून हे संशोधन केले आहे.

५) डॉ. ढेरे यांच्या या संशोधनातून पुढील अनेक संशोधकांना प्रेरणा मिळत गेले हे सत्य आहे.

६) त्यांच्या संशोधनातून प्रथमच आन्ध्र, तामिळनाडू, कर्नाटक यांचे महाराष्ट्राशी असलेले सांस्कृतिक नाते व त्यांचा प्रभाव विविध ग्रंथांतून अधोरेखित झाला आहे

७) मराठी, संस्कृत या भाषा तर त्यांच्या परिचयाच्या आहेत. नाणी, शिलालेख, प्राचीन मराठी, संतसाहित्य, स्थानमहात्म्य-पोथ्या, मूर्ती-शिल्प, देवळे-राऊळे, वाक्प्रचार-म्हणी, व्युत्पत्ती, रूढी -उपचार-परंपरा हे सर्व त्यांच्या अभ्यासाची सामग्री होती.

**समारोप-**

महाराष्ट्रातील धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, लोकसंस्कृती, लोकसाहित्य, संतसाहित्य आणि काव्यशास्त्र याविषयी संशोधन करणारे व्रतस्थ संशोधक, अभ्यासक, लेखक आणि संपादक, हीच ओळख आज डॉ. रा. चिं. ढेरे यांची आहे. महाराष्ट्र संस्कृतीच्या भाष्यकारांपैकी एक महत्त्वाचे भाष्यकार म्हणूनही त्यांचे स्थान आहे. महाराष्ट्राच्या धर्मजीवनाचा, समाजधारणांचा आणि सांस्कृतिक इतिहासाचा त्यांनी खोलवर शोध घेऊन त्याचा नवा अन्वय लावला आहे. या कायार्तून त्यांनी भारतीय संस्कृतीशी असलेला मराठीचा अनुबंधही स्पष्ट केला.

**संदर्भ :**


१) ढेरे, अरुणा ; गजेंद्रगडकर, वर्षा (संपा), लोकसंस्कृतीचे प्रातिभ दर्शन (डॉ.रा.चिं.ढेरे :व्यक्ती आणि वाङ्मय), पद्मगंधा प्रकाशन , पुणे, २०१७.

२) गणोरकर, टाकळकर डहाके गडकर भटकर संपा दित मराठी वाङमय कोष -१९२० ते २००३ संपादक - गणोरकर, टाकळकर, डहाके, दडकर ,भटकर - ग. रा. भटकळ फाउंडेशन, मुंबई,२००४

३) ढेरे, रा. चिं., लोकसंस्कृतीची क्षितिजे , विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९७१

४) डहाके वसंत बाबाजी, महाराष्ट्र : इतिहास, संस्कृती ,साहित्य; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००५११

५) कुळकर्णी गो.म., शेटे वि. त्र्यं., दास्ताने, महाराष्ट्राची सत्वधारा, पुणे ,१९८१